# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८ जा.क्र. 5011 /शि.वि./२०१५
EmailID:education.nmc@gmail.com दि.27/१०/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- डासअळी तपासणी मोहिम दिवस -दि. १८.१०.२०१५ करीता जनजागृती करणेबाबत.**

**संदर्भ :- १)कार्यालयीन पत्र क्र. ४९४९/शिवि/२०१५ दि.०८.१०.२०१५.**
**२)मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कक्षातील दि.०८.१०.२०१५ रोजी झालेल्या सभेतील निर्देशानुसार.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, हिवताप व हत्तीरोग विभाग, म.न.पा., नागपूर यांच्यातर्फे नागपूर शहर डासमुक्त करण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात येत आहे .याबाबत मा.जिल्हाधिकारी यांच्या कक्षात दि.०८.१०.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेतील निर्देशानुसार आपल्या शाळेतील विद्यार्थी मार्फत आपल्याला जनजागृती मोहिम राबवयाचे आहे. याकरीता आरोग्य शिक्षण तपासणी नमूना तयार करण्यात आला असून तो आपणांस पाठविण्यात आलेला आहे. हा तपासणी नमूना आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावा. व सर्व विद्यार्थ्यांचे तपासणी नमूना गोळा करून ते हिवताप व हत्तीरोग विभाग, म.न.पा.,शुक्रवारी तलाव, महाल, नागपूर येथे पोचवावेत.असे निर्देश संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु आपण आजपर्यंत आपल्या शाळेतील नमूना प्रपत्र हिवताप व हत्तीरोग विभाग, म.न.पा., शुक्रवारी तलाव, महाल, नागपूर येथे जमा केलेले नाही, अशी माहिती प्राप्त झालेली आहे. ही गंभीर बाब असून या विलंबाबाबत स्पष्टीकरण सादर करून त्वरीत आपल्या शाळेतील नमूना प्रपत्रे उपरोक्त विभागात जमा करावे व पोच पावती स्पष्टीकरणासह सादर करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर